## पोस्टर प्रदर्शन

# भारताच्या अग्निशिखा

## भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महिलांचा सहभाग





# 1857 च्या बंडामध्ये महिलांचे योगदान



# कूयिली

कूयिली ह्या शिवगंगाची राणी वेलू नचियारच्या लष्करप्रमुख होत्या. वेलू नचियार ह्या 1780 च्या दशकात ब्रिटिशांशी लढणाऱ्या सम्राटांपैकी एक होत्या. इंग्रजांविरुद्धच्या या युद्धात कूयिलींनी आपल्या राज्यासाठी प्राणाची आहुती दिली होती. त्यांचा जन्म एका गरीब दलित कुटुंबात झाला होता. त्यांच्या वडिलांनी राणीसाठी गुप्तहेर म्हणून काम केले ज्यामुळे कूयिली ह्या वेलू नचियारच्या संपर्कात आल्या.

त्यांनी अनेक वेळा राणी वेलू नचियारचे प्राण वाचवले, त्यानंतर त्यांना राणीचे अंगरक्षक म्हणून नियुक्त केले गेले आणि नंतर त्या महिला सैन्याच्या लष्करप्रमुख बनल्या. इंग्रजांनी शिवगंगेच्या राजवाड्यावर हल्ला केला तेव्हा त्यांनी त्यांचा शौर्याने सामना केला. कूयिली आणि त्यांच्या सैन्याने आपली शस्त्रे लपवून इंग्रजांना थक्क केले. एवढेच नाही तर त्यांनी ब्रिटिश शस्त्रास्त्रांचा साठा नष्ट करण्यासाठी आपले शरीर तेलात बुडवून ते पेटवून घेतले. एक दलित महिला म्हणून त्यांनी दिलेले शौर्य आणि त्यांनी ब्रिटिशांशी केलेला सामना कायम स्मरणात राहील.





# राणी लक्ष्मीबाई

**(19 नोव्हेंबर 1828 - 18 जून 1858 । वाराणसी, उत्तरप्रदेश)**

मनिकर्णिका ऊर्फ मनु यांचे 14 व्या वर्षी लग्न लागले आणि 18 व्या वर्षी महाराज गंगाधरराव नेवाळकरांच्या मृत्यूनंतर त्या झाशीच्या उत्तराधिकारी बनल्या. लॉर्ड डलहौसीने गंगाधरावांचा स्वतःचा पुत्र नाही असे म्हणून झाशी संस्थानाला खालसा करण्यास सांगितले. त्याला विरोध करत स्वाभिमानी राणीने "मी माझी झाशी देणार नाही", असे स्फूर्तीदायक उद्गार काढले. राणी लक्ष्मीबाई धोरणी, चतुर, युद्धशास्त्रनिपुण, शूर आणि थोर कर्तृत्व व नेतृत्व असणाऱ्या होत्या.

1857 चा उठाव हा संपूर्ण हिंदुस्थानात झाला. त्याप्रमाणे 5 जून, 1857 ला झाशीतही केवळ 35 शिपायांनी इंग्रजांना पळवून लावले. राणी पुन्हा राज्यकर्त्या झाल्या होत्या, परंतु अतिशय बिकट परिस्थितीत त्यांच्या हाती राज्यकारभार आला होता. जून 1858 रोजी ब्रिटिश अधिकारी स्मिथने राणीवर हल्ला केला. या युद्धात इंग्रजांशी लढत असताना राणी रक्तबंबाळ होऊन घोड्यावरून खाली कोसळली. आपला देह क्रूर इंग्रजांच्या हाती लागू नये या त्यांच्या इच्छेपोटीच एका सेवकाने त्यांना मुखाग्नी दिला. झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी वयाच्या तेविसाव्या वर्षी मरण स्वीकारले आणि अशाप्रकारे एका शूर राणीला रणांगणात वीरमरण आले.



# झलकारीबाई

**(22 नोव्हेंबर 1830 - 5 एप्रिल 1858 । उत्तरप्रदेश)**

एका निर्धन कोरी (कोळी) कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या धाडसीपणामुळेच त्यांचं लग्न झांसीच्या गंगाधररावांच्या सेनेत असणारा एक जिंदादिल सैनिक पूरन कोरी यांच्यासोबत लावून दिले. जेव्हा त्यांची बहादुरी झाशीच्या राणीच्या कानावर गेली तेव्हा राणीने ताबडतोब त्यांना आपल्या महिलांच्या दुर्गासेनेत दाखल करून घेतले. तिथे त्यांनी बंदूक चालवणे, तोफ डागणे व तलवारबाजीचे रितसर प्रशिक्षण घेतले.

1858 च्या एप्रिलमध्ये लक्ष्मीबाईंनी झाशीच्या किल्ल्यातून आपल्या सेनेचे नेतृत्व केले आणि ब्रिटीशांना सळो की पळो करून सोडले. परंतु दूल्हेराव या एका दगलबाज सेनानायकाने किल्ल्याचा दरवाजा उघडून ब्रिटिशांना सहाय्य केले. तेव्हा झलकारीबाईंनी राणीला काही सैनिकांसमवेत किल्ला सोडण्याचा सल्ला दिला आणि लढ्याची सूत्रे स्वतःच्या हातात घेतली. त्याचवेळी किल्ला बहादूरीने लढवत असताना झलकारीबाईंचा नवरा पूरन धारातिर्थी पडला. स्वतःचे दुःख बाजूला ठेवत झलकारीने राणी लक्ष्मीबाईंसारखे कपडे परिधान करून ब्रिटिशांना गुंगारा दिला.

बुंदेलखंडात झलकारीविषयी लोककथा आणि लोकगीते प्रसिद्ध आहेत, ती अभिमानाने ऐकली-ऐकवली-गायली जातात. रायबरेली, अजमेर, ग्वाल्हेर इथे त्यांचे पुतळे पाहायला मिळतात. भारत सरकारने त्यांच्या नावाचे पोस्टाचे तिकिट प्रसिद्ध केले आहे.



# बेगम हज़रत महल


(1820 - 7 एप्रिल 1879 । फैजाबाद, उत्तरप्रदेश)



फैजाबाद या गावी एका गरिब कुटुंबात जन्म झालेली मुहम्मदी खानुम ही गणिका होती. नवाब वाजीद अली यांनी निकाहानंतर तिचे नाव बदलून बेगम हज़रत महल असे ठेवले.

13 फेब्रुवारी 1856 रोजी इंग्रजांनी अवधचे राज्य खालसा केले. नवाब वाजीद अलींना कलकत्यात नजरकैदेत ठेवण्यात आले. तेव्हा बेगम हज़रत महल यांनी इंग्रजांच्या अरेरावीला विराध करण्याचे ठरवून आपल्या 14 वर्षाच्या मुलासह लखनौमध्येच राहण्याचे ठरविले. त्या शस्त्रास्त्रे चालविण्यात तरबेज होत्या. त्या एक कुशल रणनीतीकार होत्या, ज्यांच्याकडे लष्करी आणि लढाऊ कौशल्यासह अनेक गुण होते. इंग्रजांच्या तावडीतून आपले राज्य वाचवण्यासाठी त्यांनी ब्रिटिश सैन्याविरुद्ध धैर्याने लढा दिला.

बेगम हज़रत महल यांनी सर्व धर्मांना समान मानले, त्यांनी कधीही धर्माच्या आधारावर भेदभाव केला नाही. त्यांनी सर्वप्रथम इंग्रजांवर हिंदू-मुस्लिम धर्मात फूट आणि द्वेष निर्माण केल्याचा आरोप केला होता. त्यांनी महिलांचे सैनिक दल उभारून इंग्रजांच्या सैन्याचा कडवा प्रतिकार केला होता. अखेर 18 मार्च 1858 रोजी बेगम हजरत महलचा इंग्रजांनी पराभव केला. त्यानंतर त्यांनी नेपाळमधल्या तराईच्या जंगलात आश्रय घेतला. काही वर्षांनंतर काठमांडूला राहत असतानाच 1879 मध्ये त्यांचा मृत्यू झाला.



# उदा देवी

(मृत्यू : नवंबर, 1857 | लखनऊ, उत्तरप्रदेश)

उदा देवीची कथा ही ब्रिटिशांशी लढा देणाऱ्या दलित महिला सैनिकाची कथा आहे. स्वातंत्र्यलढ्यात दलित महिलांचे विशेष योगदान होते. 1857 च्या बंडात उदा देवीसारख्या अनेक दलित नायिका होत्या. इंग्रजांविरुद्ध लोकांचा वाढता राग पाहून उदा देवी आपल्या जिल्ह्याची राणी बेगम हजरत महल यांच्याकडे युद्धात सहभागी होण्यासाठी आल्या. बेगमने उदा देवी यांना प्रशिक्षण दिले आणि त्यांच्या नेतृत्वाखाली एक महिला बटालियन तयार करण्यात आली.

इंग्रजांनी जेव्हा अवधवर आक्रमण केले तेव्हा उदा देवी आणि त्यांचे पती मक्का पासी दोघेही सशस्त्र प्रतिकाराचा भाग होते. मक्केच्या युद्धात हौतात्म्य पत्करल्यानंतर, उदा देवीने सिकंदर बागच्या युद्धात स्वतःला झोकून दिले. रणांगणात झाडावर चढून तिने अर्धा डझनहून अधिक ब्रिटिश सैनिकांना ठार मारले आणि नंतर शहीद झाली.


# 1857 - खान्देश भिल्ल उठाव

## उठावात
## 400 पेक्षा जास्त
## भिल्ल वीरांगनांचा सहभाग

*“भिल्ल स्त्रिया पुरुषांइतक्याच उपद्रव देतात तसेच त्या लढतातही. त्यांचे पुढारी भागोजी व अन्या नाईक यांना पकडेपर्यंत या बायकांना ओलीस ठेवले पाहिजे.”*

*- पोलीस आयुक्त गृहसचिवाला लिहितो (1858)*





# सावित्रीबाई फुले

**(3 जानेवारी 1831 – 10 मार्च 1897 । नायगांव, महाराष्ट्र)**

मुलींच्या शिक्षणाचा दरवाजा खुला करणाऱ्या सावित्रीबाई फुले. या फक्त पहिल्या महिला शिक्षिका नव्हत्या, तर ‘सत्य शोधक समाजा’ च्या सह-संस्थापिकाही होत्या. बालविवाह, गर्भातच मुलींना मारणे, सती, याविरोधात विधवा विवाहाला मान्यता देणे अशी कामं करणाऱ्या ‘महिला सेवा मंडळा’च्या संस्थापिकाही होत्या.

एवढंच नाही तर, फसलेल्या विधवांचा सांभाळ करण्यासाठी उभारलेल्या ‘बाल हत्या प्रतिबंधक गृह’च्या संस्थापिका, विधवा केशवपनाच्या विरोधात न्हाव्यांचा संप घडवून आणणाऱ्या, महिलांना जातींची बंधने झुगारून बैठकांसाठी एकत्र बसायला प्रेरित करणाऱ्या, जोतिबांच्या भाषणांचं संपादन करून प्रसिद्ध करणाऱ्या, जोतिबांच्या मृत्यूनंतर त्यांचं टिटवं समाजाच्या विरोधात जाऊन समर्थपणे घेणाऱ्या, ‘काव्य फुले’ आणि ‘बावन्न कशी सुबोध रत्नाकर’ हे दोन काव्यसंग्रह लिहीणाऱ्या कवयित्री देखील होत्या. सगळयात महत्त्वाचे म्हणजे पुण्यातील प्लेगच्या साथीत जनतेच्या सेवेसाठी सर्वस्व वाहून दररोज 2000 मुलांना त्यांनी मोफत जेवू घातले आणि त्याच जीवघेण्या साथीत सेवा करत करत त्यांनी अखेरचा श्वास घेतला!





# कॅप्टन लक्ष्मी सहगल

(25 ऑक्टोबर 1915 - 23 जुलै 2012 । मद्रास, केरळ)

'राणी झाशी पलटण' - जगातील पहिली महिला पलटण आणि कॅप्टन लक्ष्मी सहगल महिला पलटणीची पहिली महिला कमांडर, जगातील पहिली कॅबिनेट मंत्री - महिला व बालकल्याण खात्याची - हे मान कॅप्टन लक्ष्मींना मिळाले. गांधीवादी कार्यकर्ता श्रीमती अम्मू स्वामिनाथन यांची कन्या. त्यांच्या धाडसामुळे त्यांना 'कर्नल' पद देण्यात आले, बहुधा आशिया खंडात पहिल्यांदाच एखाद्या महिलेला हे पद देण्यात आले. तरीही त्या 'कॅप्टन लक्ष्मी' म्हणून लोकप्रिय राहिल्या.

कॉलॉ नावाच्या गावी दीर्घ काळ आजारी असणाऱ्या जवानांसाठी आझाद हिंद सरकार इस्पितळ बांधत होते. राण्यांचे पथक त्यांनी रंगूनला पाठविले. काही डॉक्टर्स व सेवक बरोबर घेऊन बाँबहल्ल्याला तोंड देत व जीव बचावत कॅ. लक्ष्मी कॉलॉला पोहोचल्या. शिधा संपत आल्यामुळे त्यांच्याबरोबरचे दोन जवान शत्रूला शरण गेले. उरलेला शिधा म्हणजे ज्वारीच्या कण्या. दोन-तीन माणसांना दोन दिवस पेजेसाठी पुरतील इतक्याच होत्या. हालचाल केली तर श्रम होऊन भूक लागेल, म्हणून कॅ. लक्ष्मी हालचाल न करता पडून होत्या.

# ग्रामीण महिला क्रांतिकारक

# राजमती पाटील बिरनाळे

**(मृत्यू : 12 ऑक्टोबर, 2003 । सातारा, महाराष्ट्र)**

राजमती पाटील या पत्रीसरकार आंदोलनातील एक प्रमुख नायिका. 1942 ची 'चलेजाव चळवळ' सुरू झाली त्या वेळी त्या सातवीत शिकत होत्या. तिथे कैलासचंद्र मेहता, भाई विभूतें यांच्या प्रभावाने काम करू लागल्या. रात्रीच्या वेळी भित्तीपत्रके तयार करणे, पत्रकांच्या नकला उतरवून त्या वाटण्यासाठी देणे असे काम त्या करत.

9 ऑगस्ट 1943 ला गुपचुप एका पाच फुटी काठीला तिरंगा बांधून घोषणा देत त्या सोलपूरच्या टिळक चौकात गेल्या व आपला असहकार पुकारला. त्यांच्याभोवती लोक गोळा झाले. सर्वांनी तिरंग्याचा व भारतमातेचा जयजयकार केला व त्यांनी तिथे तिरंगा फडकाविला. झेंडा उभारून सत्याग्रह केल्याबद्दल त्यांना सहा महिन्यांची व न्यायाधीशांच्या हातीच पत्रके कोंबल्याच्या आरोपावरून त्यांना आणखी 3 महिन्यांची सजा व आणखी 200 रुपये दंड आणि दंड न भरल्याने आणखी 2 महिन्यांची सजा ठोठावण्यात आली.

प्रतिसरकारने सावकारांची, जमीनदारांची गुंडगिरी संपवली. त्या गुंडांचा पार निःपात केला. या सर्व कामात राजमतींची मोठी मुख्य भूमिका होती. हत्यारे व काडतुसे वाहून नेऊन सुरक्षित स्थळी पोहोचविण्याचे, खडकीहून व बेळगावहून दारूगोळा घेऊन येण्याचे अत्यंत जोखमीचे काम त्यांनी केले .

वाळवे तालुका हा दरोडेखोर व रामोशांचा तालुका म्हणून कुप्रसिद्ध होता पीक तयार झाले की अर्धेतरी ते घेऊन जात. शिवाय पैशांची मागणी असेच. कुणाचे कान काप, तर कुणाचा हात तोड असा ते क्रूरपणाही करत. ब्रिटिश सरकारने त्यांच्यापुढे हात टेकले होते. या गुंडांचा बराचसा बंदोबस्त प्रतिसरकारने केला. त्यातही राजमतीने दोन-चार दरोडेखोरांना यमसदनाला पाठविले.

राजमतींच्या गटाने सर्वांत मोठा दरोडा हा 'धुळे खजिन्या'वर घातला. या लुटीतील नागनाथ नायकवडी यांच्या गटाच्या वाटणीला आलेले पैसे राजमतीने आपल्या घरात खड्डा खणून पुरले. पुढे महाराष्ट्रभरच्या क्रांतिकारकांना ते कामासाठी वाटले गेले.



# हौसाबाई पाटील



**(12 फेब्रुवारी 1926 - 23 सप्टेंबर 2021 | सांगली, महाराष्ट्र)**

हौसाबाई पाटील या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील सैनिक आणि स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारणी, प्रतिसरकारची स्थापना करणारे स्वातंत्र्यसैनिक क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कन्या.

इंग्रजांविरोधातल्या लढ्यात पत्री सरकारमधील कार्यकर्त्यांनी विविध प्रकारची सोंगं, भन्नाट कल्पना लढवून इंग्रजांना जेरीस आणले होते. इंग्रजांनी ठिकठिकाणी उभारलेले डाक बंगले जाळणे असो, रेल्वेचे रूळ उखाडणे असो, फोनच्या तारा तोडणे असो वा इंग्रजांचा खजिना लुटणे असो किंवा इंग्रजांच्या नजरा चुकवून भूमिगत असलेल्या कार्यकर्त्यांना निरोप पोहोचवणे, त्यांच्या जेवणाची व्यवस्था करणे, रुग्णांची काळजी घेणे अशी कामे त्यांनी केली.

पोलिसांचा ससेमिरा चुकवत, जंगल तुडवत, समुद्राची खाडी पोहून पोलिसांच्या हातावर तुरी ठेवून पसार होत स्वातंत्र्यलढ्यासाठी रायफली, हत्यारे आणण्याची त्यांची कामगिरी अंगावर शहारे उभी करणारी आहे.

त्यांना नाशिक येथील तुफान सेनेच्या वतीने 'वुमन ऑफ द मिलेनियम' पुरस्कार जाहीर झाला.



# म. गांधीच्या प्रभावाखाली स्वातंत्र्यलढ्यात सहभागी महिला





# अवंतिकाबाई गोखले

(17 सप्टेंबर 1882 - 26 मार्च 1947 | महाराष्ट्र)

गांधीजींची पहिली शिष्या व त्यातही पट्टशिष्या ही अवंतिकाबाई गोखले यांची ओळख. 1916 मध्ये लखनऊ कॉंग्रेस अधिवेशनात त्यांची गांधीजींशी ओळख झाली. त्यांनी चंपारण्यातील सत्याग्रहापासून गांधीजींना साथ दिली. स्त्रियांच्या व्यक्तिविकास, सबलीकरणासाठी व शिक्षणासाठी त्यांनी गिरगावात 'हिंद महिला समाजा'ची स्थापना केली. या समाजात सूतकताईचे वर्ग सुरू केले, चाळीचाळीत फिरून राष्ट्रीय कीर्तने घडवून आणली.

1930 व 32 सालच्या मिठाच्या सत्याग्रहात मुंबईतून शेकडो स्त्रिया सामील झाल्या. त्याचे श्रेय बाईंनाच जाते. एक नि:स्पृह, स्पष्टवक्ती, अनुशासनप्रिय कार्यकर्ती म्हणून स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात त्यांना मानाचे पान आहे.

इचलकरंजीच्या राणीबरोबर त्यांना विलायतेला जायची संधी मिळाली. तिथे गेल्यावर त्यांनी अनेक इस्पितळांना भेटी देऊन तिथल्या कार्यपद्धतीची माहिती करून घेतली. त्यापासून स्फूर्ती घेऊन मायदेशी परतल्यावर गिरणगावात त्याच पद्धतीने त्यांनी काम सुरू केले. या भागात त्यांनी शिक्षणाचे व आरोग्याचे महत्त्व व मुलांचे योग्य पालनपोषण या बाबतीत जाणीवजागृती केली. तसेच या भागात गिरणी कामगार स्त्रियांसाठी भारतात प्रथमच पाळणाघरे सुरू केली.

26 ऑक्टोबर 1930 ला पोलीस कमिशनरचा हुकूम मोडून अवंतिकाबाईंनी मुंबईच्या आझाद मैदानावर झेंडावंदन केले. या झेंडावंदनापूर्वी अवंतिकाबाई महिलांचा मोर्चा घेऊन मिरवणुकीने गेल्या. या महिलांवर घोडेस्वार सोडल्यामुळे महिला पांगल्या. अवंतिकाबाईंना दुसऱ्या दिवशी पालिका सदनात अटक होऊन सहा महिन्यांची शिक्षा झाली व त्यांचे नगरसेविकापद रद्द झाले.

अवंतिकाबाई गोखले ह्या कमालीच्या धडाडीने काम करणाऱ्या, हाडाची कार्यकर्ती होत्या. साधी राहणी, स्पष्टवक्तेपणा, काटेकोर नियोजन, करारीपणा, निर्भयता हे गुण त्यांच्या अंगी बालपणापासूनच बिंबलेले होते.


एक नि:स्पृह, स्पष्टवक्ती, अनुशासनप्रिय कार्यकर्ती म्हणून स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात त्यांना मानाचे पान आहे.



# 1917 : चंपारण सत्याग्रह



मिठाचा सत्याग्रह करताना महिला



# कस्तूरबा गांधी



**(11 एप्रिल 1869 – 22 फेब्रुवारी 1944 । पोरबंदर, गुजरात)**

**“बां माझ्या जीवनात आली नसती, तर मी महात्मा झालो नसतो.**
**ती माझी सत्याग्रह शास्त्रातील गुरू आहे.”**

**– महात्मा गांधी**

गांधीजी आपल्या ‘सत्याचे प्रयोग’ या आत्मचरित्रात लिहितात - “अहिंसेची मूलतत्त्वे मी कस्तूरबाच्या वागणुकीतूनच शिकलो. कस्तूरबा निर्विकारही नसे किंवा आक्रमकही नसे. परंतु तिला जी गोष्ट योग्य आहे, असे मनापासून पटे तेवढेच ती करे. इतर बाबींकडे कानाडोळा करे.”

गांधीजींचे म्हणणे तिला चुकीचे वाटले तर ती सावकाश भांडणतंटा न करता कोणताही युक्तिवाद न करता सत्य काय आहे ते त्यांना दाखवून देई. गांधीजी म्हणत, “हाच गाभा अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा आहे.”

# सत्यभामा कुवळेकर उर्फ पद्मावती हरोलिकर उर्फ रमा पित्रे

(1892 - ऑगस्ट 1989 | मुंबई, महाराष्ट्र)



## महाराष्ट्रातील पहिली सत्याग्रही!

पद्मावतीबाई शंभर वर्षांच्या इतिहासाच्या साक्षीदार होत्या. महात्मा गांधींच्या पहिल्याच भाषणाने प्रभावित होऊन त्यांनी स्वतःला स्वातंत्र्य चळवळीत झोकून दिले होते. व्यंकटेश हरोलीकर या स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्त्याला महारोग झाल्यानंतर त्यांची सेवा करताना लोकांनी नावे ठेवू नयेत म्हणून त्यांच्याशी लग्न करणाऱ्या, 'तरुणांनो, खेड्यात चला' हा गांधीजींचा आदेश प्रत्यक्षात आणणाऱ्या, सामान्य स्त्रीला चळवळीत आणण्यासाठी 'राष्ट्रीय युवती संघ' स्थापन करणाऱ्या, 1940 मध्ये वैयक्तिक सत्याग्रहात 'महाराष्ट्रातील पहिली सत्याग्रही' म्हणून निवड झालेल्या, तत्त्वनिष्ठ स्वातंत्र्यसैनिक पद्मावतीबाई हरोलीकर या तेजस्वी शलाकेविषयी...

1920 साली किर्लोस्कर नाट्यगृहात झालेल्या गांधीजींच्या सभेला सत्यभामाबाई सेवासदनमधील मैत्रिणींबरोबर गेल्या होत्या. महात्माजींच्या या भाषणाचा सत्यभामाबाईंवर फारच खोल परिणाम झाला. सभा संपल्यावर आपल्या अंगावरचे दागिने उतरवून त्यांनी गांधीजींच्या हातात दिले. "स्त्रीचे सौंदर्य दागिन्यात नसून तिच्या सुदृढ प्रकृतीत, करारी चेहऱ्यावर व कर्तव्यनिष्ठेत आहे," हे गांधीजींचे विधान पटले असून आपण यापुढे दागिन्यांचा स्पर्शही शरीराला होऊ देणार नाही अशी शपथ घेतली व ती आजन्म पाळली.

त्यांचे पती व्यंकटेशराव हरोलीकरांनी केलेल्या वादग्रस्त विधानामुळे राजद्रोहाच्या व खुनाला प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली खटला चालला. 1928 साली दोघांनाही दोन दोन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा झाली. तुरुंगात हरोलीकरांना कुष्ठरोग झाल्याचे आढळले. त्यामुळे त्यांना शिक्षा पूर्ण होण्याआधीच सोडून दिले. हे जेव्हा सत्यभामाबाईंना कळले तेव्हा त्या त्यांची मलमपट्टी करायला, सेवा करायला त्यांच्या घरी जाऊ लागल्या. आधीच विधवा असलेल्या सत्यभामाबाईंबद्दल लोक कुजबुजू लागले.

तुम्ही घरी येत राहिलात तर लोक तुमची बदनामी करतील तेव्हा तुम्ही घरी येणे बंद करा असे व्यंकटेशरावांनी त्यांना सांगितले. "इतकीच अडचण असली तर तुमच्याशी लग्न करून नाते जोडायला मी तयार आहे. तुमच्यासारखा देशभक्त आणखी काही वर्ष माझ्यामुळे जगला व देशकार्य करू शकला तर त्यासारखे पुण्य काम दुसरे नाही. तेव्हा आता निदान तुमच्याशी लग्न करायला मला परवानगी द्या. माझ्या स्वतःच्या वैयक्तिक फायद्यासाठी मला संसार मांडायचा असता, तर माझ्या सासऱ्यांच्या इच्छेलाच मी मान दिला असता. तुम्ही देशाचा संसार मांडला आहे. त्यासाठी तुम्ही जगणे भाग आहे व म्हणूनच तुम्हाला जगविणे माझे कर्तव्य आहे."

निरुत्तर झालेल्या हरोलीकरांनी सत्यभामेच्या सासऱ्यांच्या संमतीने तिच्याशी विवाह केला व सत्यभामाबाईंनी पद्मावती व्यंकटेश हरोलीकर या नावाने संसार सुरू केला. त्यांनी व्यंकटेशरावांना परिश्रमपूर्वक बरे केले. पुढे दोघांनी मिळून सुमारे पंधरा वर्षे चळवळीला पूर्ण वाहून घेतले. विधायक कार्यक्रम राबविला व ग्रामसुधारणेचे काम केले.

1930 ते 32 दोन वर्षे त्यांना कारावास घडला. 1940 मध्ये वैयक्तिक सत्याग्रहात त्यांची 'महाराष्ट्रातील पहिली सत्याग्रही' म्हणून निवड झाली होती. त्या सत्याग्रहात त्यांना तीन महिन्यांचा तुरुंगवास सोसावा लागला. 1942 च्या 'चले जाव'च्या चळवळीत त्यांना दहा महिने स्थानबद्ध केले होते.

पद्मावतीबाई शतायुषी होत्या. त्यांनी स्वातंत्र्याची 40-42 वर्षे पाहिली. 'चले जाव'ची सुवर्णजयंतीही पाहिली व त्यानंतर एक महिन्यातच त्यांचे निधन झाले. स्वातंत्र्यसैनिकांची कोणतीही मानपत्रे त्यांनी स्वीकारली नाहीत. मानधनासाठी अर्जही केला नाही. आपल्या कामाची पैशात किंमत करणे त्यांना मंजूर नव्हते.



# जानकीबाई आपटे

(मृत्यू: 28 ऑगस्ट 1962 | महाराष्ट्र)



जानकीबाई परशुराम आपटे चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण. समाजकार्यात पडण्यापूर्वी घरात भरपूर सोवळेओवळे असे. अशा जानकीबाई आपल्या मुलांच्या पंक्तीला हरिजन मुलांना जेवू घालू लागल्या. त्यांचे उष्टे, खरकटे व भांडी घासणे हेही रोजच्या कामाबरोबर करू लागल्या. 1938 सालापासून त्या हरिजन वस्तीत जाऊन मुलींच्या डोक्यातील उवा काढणे, मुलांना आंघोळ घालणे, बायकांना स्वच्छतेचे महत्त्व सांगणे, साक्षरता प्रसार करणे इत्यादी कामे करीत. दलितोद्धाराचे काम पाहून लोकच त्यांना 'महाराष्ट्राच्या ठक्करबाप्पा' म्हणू लागले.

1930 साली मिठाच्या सत्याग्रहाच्या प्रचारार्थ आलेल्या काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या कमलादेवी चट्टोपाध्याय यांचे भाषण ऐकून कमलादेवींच्या चळवळीला हातभार लावण्याच्या दृष्टीने स्त्रियांची संघटना बांधणे आवश्यक आहे असे त्यांच्या मनाने घेतले. त्यांनी 'हिंद सेविका संघाची' स्थापना केली. त्यात हरिजन स्त्रियांना सहभागी करून घेऊ लागल्या. हळदी-कुंकवाच्या वेळी त्यांनी यावे म्हणून स्वतः घरोघरी जाऊन हरिजन स्त्रियांना आमंत्रण देऊ लागल्या. जानकीबाईंच्या संघटनांमुळे नगर व आसपासच्या स्त्रिया आपोआप काँग्रेसमध्ये येऊ लागल्या.



# अनसूयाबाई काळे


(24-ऑगस्ट-1898 – 1958 । बेळगांव, महाराष्ट्र)



1943 मधील चिमूर अष्टी हत्याकांड प्रकरणातील 25 गोंड आदिवासी लोकांना त्यांनी फाशीच्या शिक्षेतून सोडवले होते. अनसूयाबाईंनी ठक्कर बाप्पांपासून स्फूर्ती घेऊन आदिवासी व हरिजन मुलांना शिकवायला सुरुवात केली. हरिजनांसोबत सहभोजन केल्यामुळे काळे पती-पत्नीवर ब्राह्मण जमातीने बहिष्कार टाकला; पण न डगमगता अनसूयाबाईंनी आपल्या हरिजन व आदिवासी मुलांना शिकविण्याच्या व हरिजन वस्तीत जाण्याच्या कामावर त्यांनी काहीही परिणाम होऊ दिला नाही. 1933 मध्ये गांधीजींच्या अस्पृश्यता विरोधी प्रचारात त्या सहभागी होत्या.

1937 मध्ये विधिमंडळाच्या कायदेमंडळात उपाध्यक्ष (Deputy Speaker) म्हणून निवड झालेल्या त्या पहिल्या भारतीय महिला आहेत. त्यांनी स्वतः विधेयक मांडले नसले, तरी त्यांनी काही विधेयकांवरील चर्चेमध्ये संस्मरणीय भाग घेतला आहे. श्री. दाभी यांनी मांडलेले जातीयता निर्मूलन विधेयक (1955) व हुंडाबंदी विधेयक ही त्यातील प्रमुख आहेत. 1953 च्या अर्थसंकल्पावरील चर्चेतील संतती नियमावरील त्यांचे भाषण फार गाजले होते.


# जात्यावरच्या ओव्या



गांधी माझा सखा ग | ओवी त्याला गाईन |
ओव्या गाऊ कौतुके | तू येरे बा इट्टलों ||

जवाहर माझा धीराचा | वीर तो छातीचा |
काटा काढी सोजीराचा | येरे बा इट्टला ||

जिकडे तिकडे झाले | गांधी गांधी |
अंगावर साधी खादी | बाळगीती ||



गांधी हा गारुडी | वाजविती पुंगी |
तेणे येई गुंगी | इंग्रजाला ||



गांधी जादुगार | भ्याडा करी धीट |
दास्याचा आणी वीट | जनलोका ||

पैसेवाला मोठा | मुंबईचा टाटा |
त्याने मुळशी पेटा | बुडविला ||

बाया झाल्या धीट | त्यांची गेली भीती |
हाती झेंडा घेती | स्वराज्याचा ||

उठली मुले-बाळे | त्यांना भीती कशी नाही
वंदे मातरम दिशा दाही | दणाणती ||

(संदर्भः महात्मा गांधींनी मुळशी धरण संदर्भात केलेला सत्याग्रह)

# दलित स्त्रियांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान



भारतीय स्वातंत्र्यलढ्यात समाजातील उतरंडीतील सर्वात शेवटचा घटक असलेल्या दलित स्त्रियांचेही लक्षणीय योगदान होते. म्हणून हा लढा भारतातील जनसामान्यांचा होता. त्यांचा हा लढा ब्रिटीश साम्राज्याविरोधी तर होताच, त्याचबरोबर ब्राह्मणी व्यवस्थे विरोधातही होता. तथापि इतिहासाने त्यांच्या योगदानाची पुरेशी दखल घेतलेली नाही.
त्यातील काही ज्ञात नावे व त्यांचे कार्य...

- **चंपूताई गणपतराव बनसोड:** 1930 सालच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सक्रिय सहभाग. परिणामी 6 महिने तुरुंगवास व सक्त मजुरी.

- **ताराबाई शंकर कांबळे:** 1942 च्या 'भारत छोडो' आंदोलनात सहभाग. तसेच भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांना आपल्या घरात आश्रय देऊन मदत केली होती.

- **शकुंतला रघुनाथ भालेराव:** शीव-कोळीवाडा येथील झोपडपट्टीत राहणारी महिला. ब्रिटिशविरोधी अनेक आंदोलनांत सहभाग.

- **शांताबाई भालेराव:** 1942 च्या 'भारत छोडो' आंदोलनात सहभाग. गुप्त पत्रे व संदेश पोहोचवण्याचे काम करित असत. पोस्ट ऑफिसे व पोलीस चौक्या जाळण्यातही त्या सक्रिय होत्या. परिणामी मुंबईच्या ऑर्थररोड तुरुंगात कारावास भोगावा लागला.

- **तुळसाबाई बनसोड:** सामाजिक क्षेत्रातील सक्रिय कार्यकर्त्या. जनजागृतीसाठी नवऱ्याने चालवलेल्या प्रिंटिंग प्रेसच्या व्यवस्थापनात प्रमुख भूमिका बजावली.

- **वेणूताई शिवतारकार, जानकीबाई जाधव, देवकाबाई सातांबकर:** यांच्या नेतृत्वाखाली दलित महिला मंडळाची स्थापना करण्यात आली. 29 जानेवारी 1928 रोजी दलित महिला परिषदेचे आयोजन.

# दलित स्त्रियांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान



- **गोपिकाबाई बाजीराव फुलझेले:** 1932 साली स्वातंत्र्यचळवळीत सहभाग. तीन महिने कारावासाची शिक्षा.

- **रुक्मिणी राजभोज, शांताबाई चव्हाण:** 1946 सालच्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या सत्याग्रहात सहभाग.

- **सरसतीबाई घराडे:** गिरणी कामगाराची मुलगी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील चळवळीत सक्रिय सहभाग. कुटुंबावर कबीर, गाडगेबाबा यांसारख्या संतांच्या प्रभाव होता. `एक गाव एक पाणवठा' या महाराष्ट्र सरकारच्या अस्पृश्यता निवारणाच्या अभियानात सक्रिय सहभाग. त्यादरम्यान त्यांना बेदम मारहाण. दलितांवरील अत्याचाराविरोधातील लढ्यात सहभाग.

- **कौसल्या बैसंत्री (नंदेश्वर):** आक्रमक दलित महिला नेत्या. कष्टकरी दलित कुटुंबात नागपूर येथे जन्म. 1945 साली इंग्रजी माध्यमातून विज्ञान शाखेतील पदवी घेतली. पुढे आंबेडकरी चळवळीत सक्रिय झाल्या. प्रॉव्हिन्शियन शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या संयुक्त चिटणीस बनल्या. पुढे भारतीय महिला जागृती परिषदेच्या एक संस्थापक सदस्यही बनल्या. बालकल्याणासारख्या अनेक कल्याणकारक उपक्रमात हिरीरीने सहभागी.

- **शांताबाई दाणी:** दलित चळवळीतील एक ज्येष्ठ नाव. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन ऑफ इंडियाच्या सचिव राहिल्या. ‘भूमिहीनांचा सत्याग्रह’ या भूमिहीन शेतमजुरांच्या सत्याग्रहात त्यांची भूमिका महत्त्वाची होती. यात भाग घेतल्यामुळे त्यांना येरवडा तुरुंगात कारावास. सक्रिय राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी दुर्बळ गटांतील मुलांच्या शिक्षणासाठी ‘ज्ञान विकास केंद्र’ ही संस्था स्थापन केली.

- **बेबीताई कांबळे:** दलित समाजासोबतच इतरही शोषित घटकांच्या प्रश्नांबद्दल जागरुक व्यक्तिमत्त्व. भटक्या व अन्य जमातींतील विद्यार्थ्यांसाठी एक आश्रम सुरू केला. शेतकरी-कामगार-आदिवासी यांच्या चळवळीत सक्रिय.

# सभा सभा का खेल

- सुभद्राकुमारी चौहान



सभा सभा का खेल आज हम
खेलेंगे जीजी आओ,
मैं गाधी जी, छोटे नेहरू
तुम सरोजिनी बन जाओ।

मेरा तो सब काम लंगोटी
गमछे से चल जाएगा,
छोटे भी खद्दर का कुर्ता
पेटी से ले आएगा।

लेकिन जीजी तुम्हें चाहिए
एक बहुत बढ़िया सारी,
वह तुम माँ से ही ले लेना
आज सभा होगी भारी।

मोहन लल्ली पुलिस बनेंगे
हम भाषण करने वाले,
वे लाठियाँ चलाने वाले
हम घायल मरने वाले।



छोटे बोला देखो भैया
मैं तो मार न खाऊँगा,
मुझको मारा अगर किसी ने
मैं भी मार लगाऊँगा!

हुई सभा प्रारम्भ, कहा
गांधी ने चरखा चलवाओ,
नेहरू जी भी बोले भाई
खद्दर पहनो पहनाओ।

उठकर फिर देवी सरोजिनी
धीरे से बोलीं, बहनो!
हिन्दू मुस्लिम मेल बढ़ाओ
सभी शुद्ध खद्दर पहनो।

छोड़ो सभी विदेशी चीजें
लो देशी सूई तागा,
इतने में लौटे काका जी
नेहरू सीट छोड़ भागा।

जीजी, चलो, सभा फिर होगी
अभी सिनेमा है जाना,
आओ, खेल बहुत अच्छा है
फिर सरोजिनी बन जाना।





# मणिबेन कारा

**(1905 – 28 ऑक्टोबर 1979 | मुंबई, महाराष्ट्र)**

मणिबेन कारा शिक्षण पूर्ण करून 1929 मध्ये भारतात परत आल्यावर, त्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये सामील झाल्या. त्यांनी 'सेवा मंदिर' आणि 'मुद्रणालया'ची स्थापना केली आणि कॉम्रेड एम. एन. रॉय यांच्या रॉयिस्ट पक्षाने 'इंडिपेंडंट इंडिया' या साप्ताहिकाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी मणीबेनवर टाकली व याप्रकारे त्यांचा राजकारणात प्रवेश झाला.

त्यांचा विशेष भर ट्रेड युनियनमध्ये होता त्यामुळे त्यांनी ट्रेड युनियनमध्ये सक्रिय होण्यास सुरुवात केली. कापडगिरणी कामगार, गोदी कामगार यांच्या संघटना बांधल्या. फेरीवाल्यांच्या आणि बॉंबे टेलरिंग वर्कर्स युनियन या संघटनांमध्ये काम केले. कामगार चळवळीतील झुंजार आणि तेजस्वी पुढारी असूनही त्यांनी कधी हिंसाचाराचा आधार घेतला नाही.

कामगार नेत्यांच्या विनंतीवरून त्या अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसमध्ये (AITUC) सामील झाल्या होत्या. पुढे त्या अशोक मेहता यांनी स्थापन केलेल्या हिंद मजदूर सभच्या अध्यक्ष झाल्या.

1932 साली कामगार दिनानिमित्त आयोजित सभेत त्यांनी कामगार वर्गाच्या दुःखाबद्दल तसेच भांडवलदारांच्या शोषणाबद्दल भाषण केले म्हणून त्यांना अटक झाली आणि त्यांच्यावर खटला भरण्यात आला. तुरुंगात स्त्री-कैदी कोणीच नव्हते. म्हणूनच त्यांची कैद पुरुष कैद्यांपेक्षा अधिक त्रासदायक व कंटाळवाणी होत असे.

1946 साली मध्यवर्ती कायदेमंडळाच्या सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती केली गेली. कायदेमंडळाच्या सदस्यत्वाच्या थोड्या कालावधीतही त्यांनी दिल्लीतील हातरिक्षांना प्रतिबंध, रेल्वे कर्मचाऱ्यांना अंतरिम मदत, औद्योगिक कामगारांसाठी अधिक चांगल्या घरांची सुविधा, मध्यवर्ती सरकारच्या सार्वजनिक बांधकाम खात्यातील कामगारांना कामगार कायदा लागू करणे, रेल्वेतील कर्मचाऱ्यांना वेतन वाढवून देणे हे काही वादग्रस्त विषय लोकसभेत उपस्थित केले होते.

1946 मध्ये पश्चिम रेल्वे कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी मणीबेन कारा एकमताने निवडून आल्या. हे पद त्यांनी आयुष्यभर भूषवले.

अ. भा. महिला परिषदेच्या त्या सदस्य होत्या. भारत सरकारने स्त्रियांच्या समाजातील स्थानाच्या अभ्यासासाठी एक खास आयोग नेमला होता. मणीबेनची त्या आयोगाच्या सदस्य म्हणूनही नेमणूक झाली. या कामासाठी समाजाच्या निरनिराळया स्तरांतील स्त्रियांच्या मुलाखती घेण्यासाठी त्यांनी संपूर्ण भारताचा दौरा केला.

मणीबेन यांनी आपला अयशस्वी विवाह तोडून टाकून प्रचलित सनातनी समाजाच्या विरोधाला तोंड देत पारंपारिक आदर्शांविरुद्ध लढा दिला. त्यांनी आपले स्वतःचे घर थाटले. आणि नावामागे 'सौ.' लावण्याचे थांबवले. पुढील संपूर्ण आयुष्यात त्या 'कुमारी' मणीबेन कारा याच नावाने संबोधल्या जाऊ लागल्या. स्त्री हितकारणी या मुंबईच्या ख्यातनाम संस्थेच्या स्थापनेत मणीबेन यांनी पुढाकार घेतला होता.





# आबादी बानो बेगम

(1850 - 1 नोव्हेंबर 1924 | उत्तरप्रदेश)



आबादी बानो बेगम या पहिल्या मुस्लिम महिला ज्यांनी भारताच्या राजकारणात उत्साहाने भाग घेतला. लोकप्रिय आबादी बेगम 'बी. अम्मा' म्हणून लोकांमध्ये प्रसिद्ध होत्या.

त्यांची दोन मुले मौलाना मोहम्मद अली जौहर आणि मौलाना शौकत अली, खिलाफत आंदोलन आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे प्रमुख चेहरे होते. ज्यांना ब्रिटिश सरकार घाबरत असे. आबादी बानो यांनी खिलाफत आंदोलनात एक महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. त्या खिलाफत समितीचा भाग होत्या.

यासाठी त्यांनी पूर्ण देशाची यात्रा केली. दोन मुलांना जेल झाल्यावर बुरखा घालून भर सभेत ब्रिटिशांविरुद्ध आवाज बुलंद करणाऱ्या पहिल्या महिला होत्या. गांधींनी त्यांना राजकारणात येण्यास प्रोत्साहित केले. जेणेकरून स्वतंत्रता आंदोलनात मुस्लिम महिलांचे समर्थन मिळेल.

बेगम हसरत मोहानी, बसंती देवी, सरला देवी चौधरानी आणि सरोजिनी नायडू यांच्यासह महिला सभांमध्ये त्या भाषण देत असत. महिलांनी आंदोलनात यावे, विदेशीचा बहिष्कार करावा असे आवाहन त्या करत असत. त्यांच्या अथक प्रयत्नाने मुस्लिम महिलांनी चळवळीत स्वतःला झोकून दिले. 1924 मध्ये त्यांचा मृत्यू होईपर्यंत त्या स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय होत्या.

# बद्रुद्दिन तैयबजींच्या कुटुंबातील स्त्रियांचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग



बद्रुद्दिन तैयबजी

बद्रुद्दिन तैयबजी हे मुंबई उच्च न्यायालयाच्या मूळ न्यायशाखेतील न्यायाधीश होते. बद्रुद्दिन तैयबजींचे जावई अब्बास तैयबजी यांनी स्वातंत्र्यलढ्यात मोठे नाव मिळवले. ते गांधीजींचे प्रिय मित्र होते. या कुटुंबातील स्त्रियांचाही स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग होता. त्यापैकी अनेकींनी खेड्यापाड्यातील मुले व स्त्रिया यांच्याशी संबंधित क्षेत्रात कार्य करून मोठेपणा मिळवला तर काहींनी सामाजिक पुनर्रचनेचे कार्य करून तर काहींनी वसाहतवादी सत्तेविरुद्ध निदर्शने करून स्वतःला अटक करून घेतली व तुरुंगवास सोसला. काही जणी स्वतंत्रपणे केलेल्या राजकीय कार्यामुळे लोकांच्या परिचयाच्या झाल्या. काही जणी आपल्या पतीच्या राजकीय कामात सहभागी झाल्यामुळे समाजाला माहित होत्या. काहींचे शैक्षणिक क्षेत्रात योगदान होते. इतर काही समाज कल्याणाचे व राष्ट्रीय एकात्मतेचे उपक्रम करीत असत.

सुसंस्कृत व सुशिक्षित स्त्रियांपैकी काहींना इंग्लंडला शिक्षणासाठी पाठविण्यात आले होते. त्या स्त्रिया फक्त मुस्लिम स्त्रियांमध्येच नव्हे तर भारतीय स्त्रियांमध्येही उठून दिसल्या. परंतु त्याहूनही अतिशय महत्त्वाची बाब म्हणजे समाजसेवा आणि व्यापक अर्थाने देशसेवा या गोष्टी त्यांनी आत्मसात केल्या होत्या. **सहभागी महिलांची नावे:**

1. **बेगम बद्रद्दिन तैयबजी, बिबी राहत उन नफ्स** (बद्रद्दिन तैयबजींची पत्नी)
2. **अमीना तैयबजी** (अब्बास तैयबजींची पत्नी)
3. **सकिना लुकमानी** (बद्रुद्दिन तैयबजींची मुलगी)
4. **सफाजबीर अली** (श्रीमती लुकमानींची सर्वात धाकटी बहीण व प्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक जबीर अली यांची पत्नी)



रेहाना तैयबजी

5. **अख्तर तैयबजी** (अब्बास व अमीना तैयबजींच्या सूनबाई)
6. **रेहाना तैयबजी** (अब्बास तैयबजींची मुलगी, महात्माजी त्यांचा उल्लेख 'माझी प्रिय कन्या' असा करीत असत)
7. **शरिफा अहमद अली** (अब्बास तैयबजींची मुलगी)
8. **बेगम नसिमा अल्मा लतिफी** (बद्रुद्दिन तैयबजींची मुलगी)
9. **फातिमा तैयबजी** (अब्बास तैयबजीं नातसून)



# कमलादेवी चट्टोपाध्याय

(3 एप्रिल 1903 - 29 ऑक्टोबर 1988 | मंगलोर, कर्नाटक)



मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी महात्मा गांधी चळवळीमध्ये महिलांच्या सहभागासाठी तयार नव्हते. कमलादेवींनीच गांधींना आपल्या कुशल बुद्धिमत्तेने स्वातंत्र्य चळवळीत महिलांचा सहभाग आवश्यक असल्याचे पटवून दिले. यामुळे महिलांनी मीठ सत्याग्रह, असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग चळवळ आणि भारत छोडो या आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. 1920 मध्ये त्यांनी 'ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्स'ची स्थापना केली, 1920 मध्येच निवडणूक लढवण्याचे धाडस केले.

तथापि, स्वातंत्र्यानंतर लगेचच, कमलादेवींनी आपले संपूर्ण लक्ष निर्वासितांच्या पुनर्वसनावर वाहून घेतले. त्यांनी भारतीय सहकारी संघाची स्थापना केली. 1950 नंतर, कमलादेवी भारतीय लोकपरंपरा आणि शास्त्रीय कलांचे पुनरुज्जीवन आणि संवर्धन करण्याच्या कार्यात सामील झाल्या. ब्रिटिश राजवटीत मोडकळीस आलेल्या हस्तकला, कला, हातमाग यांना राष्ट्रीय स्तरापासून आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचे श्रेयही त्यांनाच जाते. यामुळेच 1952 मध्ये त्यांची 'ऑल इंडिया हॅन्डीक्राफ्ट'च्या प्रमुखपदी नियुक्ती झाली. भारतात सध्या अस्तित्वात असलेल्या 'क्राफ्ट कौन्सिल ऑफ इंडिया' सारख्या संस्था या प्रयत्नांचे परिणाम आहेत.

कमलादेवी यांनी भारतीय नाट्यपरंपरा आणि इतर परफॉर्मिंग आर्टचा कल वाढवण्यासाठी 'इंडियन नॅशनल थिएटर'ची स्थापना केली. हे पुढे भारताचे प्रसिद्ध 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा' बनले. 'संगीत नाटक अकादमी'ची स्थापना केली, जी भारतीय गायन आणि नृत्य परंपरांच्या प्रगतीसाठी एक अग्रगण्य संस्था आहे.




# सिंधू देशपांडे, इंदू भट

(महाराष्ट्र)



1930 मध्ये गांधींजींनी 26 जानेवारी हा स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करण्याचा आदेश दिला होता. 17/18 वर्षांच्या सिंधू देशपांडे व इंदू भट या दोघीही त्यावेळी येरवडा तुरुंगात बंदिस्त होत्या. त्यांनी एक पांढरी, एक हिरवी व एक भगवी साडी पट्टे कापून शिवून झेंडा बनविला. त्यावर कोळशाने चरख्याचे चित्र काढले. मध्यरात्री इंदूने युनियन जॅक काढून काँग्रेसचा झेंडा लावला. दुसरे दिवशी सुमारे सकाळी 9 वाजता जेलरच्या निदर्शनास ही गोष्टी कोणीतरी आणून दिली. जेलर संतापला. इमारतीवर चढून एखादी मुलगी हे काम करेल असा संशयही त्याला आला नाही. स्वातंत्र्य मिळेपर्यंत हे काम कोणी केले हे कुणालाच कळले नाही.

“सत्याग्रह हा आत्मशक्तीचा अविष्कार असतो. तुम्हाला सत्य म्हणून जे पटलेय, त्याचा आग्रह धरणे म्हणजे सत्याग्रह. तो एका माणसाने केला काय, की दहा माणसांनी केला काय. काही फरक पडत नाही.” असे सिंधू देशपांडे यांचे सत्याग्रहाविषयीचे मत होते.



# 1942 च्या
# चले जाव आंदोलनात
# महिलांचा सहभाग





# अरुणा आसफ़ अली

(15 मार्च 1926 – 1 मे 1985 । कालका, हरियाणा)

9 ऑगस्ट 1942. स्वातंत्र्य लढ्याचा पाया मजबूत करण्याचा दिवस. मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा झेंडा फडकवणारी एक महिला देशभरातील तरुणांमध्ये उत्साह आणते आणि 'छोडो भारत आंदोलन' सुरू होते. ह्याच चळवळीने अखेर देशाला स्वातंत्र्याची भेट दिली.

कणखर कार्यकर्ती/स्वातंत्र्यसैनिक, अत्यंत तत्त्वनिष्ठता, 'चले जाव'च्या चळवळीत भूमिगत होऊन तरुण-तरुणींना क्रांतीच्या मार्गावर येण्यास प्रेरित करणारी 'चले जाव' आंदोलनाची क्रांतीज्वाला म्हणजे अरुणा असफअली.


अरुणाबाईंबद्दलच्या खऱ्या आणि रचलेल्या अनेक गोष्टी त्या काळात एकमेकांना सांगितल्या जात. त्यांना पकडून देणाऱ्याला 5000 रुपयांचे बक्षीस सरकारने जाहीर केले होते. एका नि:शस्त्र आणि एकट्या फिरणाऱ्या बाईने बलस्थ सरकारच्या हातावर साडेचार वर्षे तुरी दिली. त्या काळच्या प्रसिद्ध पत्रकाराची मदत घेऊन त्यांनी 'लिंक' नावाचे साप्ताहिक, 'पॅट्रिऑट' दैनिक चालविले होते.




देशाला बुद्धिमान नागरिकाबरोबरच खऱ्या स्वातंत्र्याचा अर्थ लोकांपर्यंत पोहोचवणारे कार्यकर्ते हवेत असे त्यांचे म्हणणे असे. गांधी, नेहरू, आझाद यांना तोंडावर स्पष्टपणे काँग्रेस पक्षाच्या चुका सांगण्याची धमक दाखविणारे असे व्यक्तिमत्त्व फिरून अवतार घेण्याची जरूरी वाटावी हेच त्यांच्या आयुष्याचे सार.

## 9 ऑगस्ट 1942, गोवालिया टँक मैदानावर प्रचंड गर्दी





# उषा मेहता

(25 मार्च 1920 - 11 ऑगस्ट 2000 । सरस, गुजरात)

उषा मेहता त्या स्वातंत्र्यसैनिक होत्या ज्या गुप्तपणे 'काँग्रेस रेडिओ' चालवण्यासाठी ओळखल्या जायच्या. त्यांनी ब्रिटिशांविरोधातील लढाईत सक्रिय भूमिका निभावली. 1928 मध्ये आठ वर्षीय उषा सायमन कमिशनच्या विरुद्ध निषेध मोर्च्यात सहभागी झाल्या. मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी त्या घरी समुद्राच पाणी आणून मीठ बनवायच्या. लहान असतानाही त्या दारूच्या दुकानांच्या समोर विरोध दर्शवायच्या आणि त्याच बरोबर जेल मधील लोकांसाठी संदेशवाहकाचे काम करायच्या.

1939 मध्ये उषा मेहतांनी कायद्याचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. पण 'भारत छोडो' ची घोषणा झाली आणि त्यानंतर त्यांनी शिक्षण सोडून स्वातंत्र्यलढ्यात उतरायचे ठरवले. या काळात महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, मौलाना आजाद यांची भाषणे ही जगभरातील काना कोपऱ्यात पोहचली पाहिजे असे त्यांना वाटत होते. आपल्या देशातील घडामोडी जगासमोर आणण्यासाठी रेडिओ खूप उपयुक्त ठरेल, असा त्यांचा पूर्ण विश्वास होता.

9 ऑगस्ट 1942 ला 'भारत छोडो' आंदोलन सुरू होणार असे जाहीर झाल्यानंतर गांधींसह जवळपास सर्व नेत्यांना त्या तारखेपूर्वी अटक करण्यात आली. तथापि, नियुक्त केलेल्या दिवशी गोवालिया टँक ग्राउंडवर खूप मोठी गर्दी जमली होती. राष्ट्रीय ध्वज उंचवण्याकरता ज्या ज्युनियर नेत्या व कार्यकर्त्यांना सोडण्यात आले त्यापैकी एक उषा मेहता होत्या. त्यानंतर 14 ऑगस्टला त्यांनी 'काँग्रेस रेडिओ'चे गुप्त स्टेशन सुरू केले. अनेक दिग्गजांनी त्यासाठी मदत केली. त्याकाळी बातम्या लोकांपर्यंत पोहोचत नसत. ही पोकळी भरून काढण्याचे काम 'काँग्रेस रेडिओ'ने केलेच, पण त्यापेक्षा महत्त्वाचे काम म्हणजे लोकांच्या मरगळलेल्या मनात नवचैतन्य फुंकण्याचे केले होते.

या स्टेशनमुळे लोकांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आणि परत एकदा लोक चळवळीत नव्या उत्साहाने सक्रिय झाले. हे भूमिगत स्टेशन शोधायचा ब्रिटिश अधिकाऱ्यांनी खूप प्रयत्न केला. पण उषा मेहता आणि सहकाऱ्यांनी स्टेशन एका जागी ठेवलेच नाही! प्रसारण झाले की जागा बदलायचे. पण 88 दिवसांनंतर एका दगाबाज सहकाऱ्यामुळे स्टेशन पोलिसांच्या ताब्यात सापडले. उषा मेहता आणि त्यांच्या सहकाऱ्यांना अटक झाली. पण तोपर्यंत या 'काँग्रेस रेडिओ'ने त्याचे काम व्यवस्थित पार पाडले होते. उषा मेहता 4 वर्ष तुरुंगात होत्या.

त्यांनी बॉम्बे युनिव्हर्सिटीमधून गांधीवादी विचारांवर पीएचडी केली. त्या 'गांधी पीस फाउंडेशन'च्या अध्यक्षाही होत्या. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचा आवेश आणि उत्साह हे महत्त्वाचे योगदान आहे.





# कनकलता बरुआ

(22 डिसेंबर 1924 - 20 सितंबर, 1942 | बोरंगबाडी, आसाम)

'भारत छोडो आंदोलना'तील सर्वात तरुण हुतात्म्यांपैकी एक ... कनकलता बरुआ. 20 सप्टेंबर 1942 रोजी वयाच्या अवघ्या 17व्या वर्षी शहीद झाली. कनकलता, ज्यांना 'वीरबाला' असेही संबोधले जाते, त्या क्रांतिकारकांच्या मृत्यूवाहिनीच्या बँडच्या सदस्य होत्या. पोलिसांच्या आदेशाचा अवमान करत, त्यांनी आसाममधील बोरंगाबारी गावातील त्यांच्या मूळ गावी पोलीस स्टेशनजवळ राष्ट्रध्वज फडकवण्यासाठी निःशस्त्र गावकऱ्यांच्या गटाचे नेतृत्व केले. ध्वज फडकवताना कनकलता त्यांना गोळी लागली, पण गोळया लागल्यावरही त्यांनी ध्वज उंच धरला. हे आपल्या महान राष्ट्राबद्दल त्यांना वाटणारे प्रेम आणि समर्पण होते.

1997 मध्ये भारतीय तटरक्षक दलाच्या ICGS या जलद गस्ती जहाजाला कनकलता बरुआचे नाव दिले आहे. 2011 मध्ये गौरीपूर येथे त्यांच्या आकारमानाच्या पुतळयाचे अनावरण करण्यात आले. अशाच धैर्यवान आत्म्यांकडून आपण प्रेरणा घेऊ या.



# मातंगिनी हाजरा


(19 ऑक्टोबर 1870 – 29 सप्टेंबर 1942 | होगला, मिदनापुर)

बंगालमधील तामुलक जिल्ह्यातील होगला गावाच्या मातंगिनी हाजरा अठराव्या वर्षी विधवा झाल्या. 1922 पासून त्या महात्मा गांधींच्या रचनात्मक कार्यात सहभागी झाल्या. स्थानिक लोक त्यांना 'बूढी गांधी' या नावाने ओळखत. सन 1930 मध्ये मिठाचा कायदा त्यांनी मोडला होता. बंगालच्या गव्हर्नर विरुद्ध 'परत चला' म्हणत काढलेल्या मोर्चामुळे तिला 6 महिन्यांची सक्तमजुरी झाली. 1932 च्या प्रांतिक काँग्रेसमधील त्यांच्या सहभागाबद्दल त्यांना अटक झाली.

1942 च्या 'चलेजाव आंदोलना'त तामुलक शहरातील 5000 स्त्री-पुरुषांनी काढलेल्या मोर्चाचे नेतृत्व 73 वर्षीय वृद्ध मातंगिनी हाजरा यांनी केले. या मोर्चाला अडविण्यासाठी सरकारने लष्कराची तुकडी रवाना केली. त्यांनी या सरकारी लष्करी तुकडीसमोर धीटपणे उभे राहून लष्करी सैनिकांना सरकारी नोकरी सोडण्याची विनंती केली; परंतु या वृद्ध स्वातंत्र्यसेनानीला लष्कराने गोळीने उत्तर दिले. हातातील झेंडा पक्का धरून तो उंचावित त्या शहिद झाल्या.

तिरंग्याच्या गौरवासाठी ज्या लोकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, त्यात या 'बूढी गांधीं'चे नाव अव्वल स्थानावर आहे.





# लिलाताई रतीलाल मर्चंट

(जन्म: 24 मार्च 1924 | तळेगाव ढमढेरे, महाराष्ट्र)

लीलाताई या काँग्रेसच्या निष्ठावंत कार्यकर्त्या होत्या. महात्मा गांधी यांनी पुकारलेल्या 'चले जाव' चळवळीत त्यांनी भूमिगतांसाठी काम केले. त्यांचे विशेष कार्य म्हणजे भूमिगत लोकांना औषधे पुरविणे, त्यांच्या घरी अन्नधान्य देणे, तुरूंगात गेलेल्या लोकांच्या घरी मदत देणे इत्यादी. या काळात पुणे शहरात चळवळीबद्दलची जनजागृती करण्यातही त्या सक्रिय होत्या. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातही त्यांनी मोलाची भूमिका बजावली.

रविवार पेठ, शुक्रवार पेठेतील सभांना त्या उपस्थित राहत होत्या. शिरूभाऊ लिमये, निळूभाऊ लिमये, रामसिंग परदेशी अशा अनेक तरुणांनी सुरू केलेल्या भूमिगत चळवळीत लिलाताईंचा सहभाग होता.

पुणे शहरात आलेला पानशेतचा पूर, दुष्काळ, भूकंप, दंगली, जाळपोळ अशा नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींच्या वेळी लीलाताई मर्चन्ट सर्वसामान्यांच्या आधारवड झाल्या. महिला व गरीब लोकांसाठी त्यांनी केलेल्या समाजसेवेमुळे लीला मर्चंट यांना पुणेकरांनी 1962 आणि 1968 च्या निवडणुकांत महापालिकेवर निवडून दिले.

परदेशी वस्तूंची होळी, हरिजन मंदिर प्रवेश, अस्पृश्यता निवारण यांपासून ते भूदान कार्यापर्यंत त्यांचा सक्रिय सहभाग होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही त्यांनी भाग घेतला होता.




# उषाताई वसंत आळेकर



**(जन्म: 22 ऑक्टोबर 1926, । पुणे, महाराष्ट्र)**

उषाताई आळेकर म्हणजे काँग्रेसचे नेते काकासाहेब गाडगीळांची मुलगी. 16 नोव्हेंबर 1942 रोजी पुण्यातील वाडिया कॉलेजमध्ये रँगलर परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित केली होती. त्यात नॅशनल वॉर फ्रन्टच्या सैन्य भरतीसाठी मार्गदर्शन केले जाणार होते. तेव्हा उषाताई, जया फाटक, सुशीला गरूड, गोदावरी जोशी, प्रभावती देशमुख, इंदुमती कुलकर्णी, नलिनी गुळगुल, शांता धूत या 8 मुलींनी सभेत बुलेटिनचे वाटप करून सभा उधळण्याचा प्रयत्न केला. त्या तिथून निघत असताना पोलिसांनी या सर्वांना पकडले. उषाताई आळेकर यांना येरवडा तुरूंगात 9 महिन्याची शिक्षा झाली.

मुंबईमध्ये गुप्त रेडिओ केंद्र चालविणारी उषा मेहता, साताराची पोलीस चौकी जाळणाऱ्या भगिनी, गुप्त संदेश रेडिओवर पोहचवणाऱ्या तेरा वर्षांच्या कुसुम मोकाशीला पोलीस शॉक देऊन त्रास देत होते पण शेवट पर्यंत तिने आपल्या सहकार्यांची नावे मात्र सांगितली नाहीत अशा अनेक आठवणी उषाताई आळेकर सांगतात.





# इंदिरा गांधी


(19 नोव्हेंबर 1917 - 31 ऑक्टोबर 1984 । उत्तरप्रदेश)


इंदिरा गांधीं, जेव्हा केवळ 12 वर्षाच्या होती, तेव्हा त्यांनी देशाला स्वतंत्र करण्यासाठी मुलांना एकत्र केले. 1930 मध्ये, त्यांनी सविनय कायदेभंग चळवळीला पाठिंबा देण्यासाठी 'बाल चरखा संघ' आणि 'वानर सेना' नावाचा गट तयार केला. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात महिलांना सार्वजनिक जीवनात आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वामुळे अनेक महिला स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्या. 1959 मध्ये काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवडून आल्याने त्यांचा राजकारणात प्रवेश अखिल भारतीय व्यक्ती म्हणून झाला.

इंदिरा गांधी या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान होत्या आणि भारतीय राजकारणाच्या इतिहासातील एक अत्यंत प्रभावशाली नेत्या होत्या. त्यांनी भारतात हरित क्रांती आणली, ज्यामुळे देशाचे अन्नधान्यांचे उत्पादन वाढले. भारत खाद्यान्न आयातीपासून स्वावलंबी बनला आणि ग्रामीण भागातील शेतीचा विकास झाला. त्यांनी 14 प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. यामुळे ग्रामीण भागात बँकिंग सुविधा पोहोचल्या आणि आर्थिक विकासात गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांना मदत झाली. इंदिरा गांधी यांचे योगदान आजही भारतीय इतिहासात महत्वाचे मानले जाते. त्यांचे कार्य देशाच्या सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय विकासासाठी दिशादर्शक ठरले आहे.

# हिंदभक्त विदेशिनी

## म. गांधींच्या प्रभावाने
## स्वातंत्र्य चळवळीत आलेल्या पाश्चात्य महिला





**मीराबेन (मॅडलीन स्लेड)**
(1892 - 1982 | इंग्लड)



**भगिनी निवेदिता**
(1867 - 1911 | इंग्लड)



**मादाम भिकाई रुस्तूम कामा**
(1861 - 1936 | मुंबई, महाराष्ट्र)



**ॲनी बेझंट**
(1847 - 1933 | इंग्लड)